# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

क्रमांक : मप्रनि/ सहसंचालक (जप्रनि)/ ब-१२९८

दिनांक : २९.०३. २०१४.

प र िप त्र क

नदी क्षेत्रातील उद्योगधंदे स्थापन करण्याबाबत धोरण पुनर्विलोकन समितीच्या दि.०७.०६.२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये नदी खोऱ्यांच्या ना विकास क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या उद्योगांचे विस्तरीकरण, उत्पादनांची अदलाबदल, आधुनिकीकरण या बद्दल झालेल्या स्पष्टीकरणाची प्रत सोबत जोडली आहे. तसेच इमारत बांधकाम (फक्त रहिवासी व वाणिज्य) प्रकल्पामध्ये सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व नागरी घनकचरा प्रक्रिया यंत्रणा इत्यादींचे स्थान याबद्दलच्या स्पष्टीकरणाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर निर्णय सर्वांच्या माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी म.प्र.नि.मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(राजीव कुमार मित्तल)
सदस्य सचिव

प्रत,

**पर्यावरण माहिती केंद्र,** म.प्र.नि.मंडळ, मुंबई - सदरचे पत्र संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावे.

D:\My document\HQ\WPAE Letter1.doc

**नदी खोऱ्यांच्या क्षेत्रातील उद्योगधंदे स्थापन करण्याबाबतच्या धोरण पुनर्विलोकन समितीच्या दि.०७.०६.२०१३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

**नदी खोऱ्यांच्या ना विकास क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या उद्योगांचे विस्तरीकरण,उत्पादनाची अदलाबदल, आधुनिकीकरणाबाबत**

दि.१३ जुलै, २००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-६ नुसर, अ-१, अ-२, अ-३ व अ-४ वर्गीकरण केलेले क्षेत्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र व पर्यावरण विषयक परवाना असलेल्या उद्योगांबाबत सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योगांपैकी काही उद्योग ना विकास क्षेत्रामध्ये असतील, लाल संवर्गातील उद्योग ना विकास क्षेत्रात असतील, तसेच काही हिरव्या व नारंगी क्षेत्रातील उद्योगांसाठी अनुज्ञेय असलेल्या भागांमध्ये अस्तित्वात असतील, अशा उद्योगांना कोणतीही बाधा येणार नाही. येथे अस्तित्वातील उद्योग म्हणजे धोरण निर्गमित करण्याच्या दिवशी चालु असलेले अस्तित्वातील उद्योग म्हणजे धोरण निर्गमित करण्याच्या दिवशी चालु उद्योग आजतागायत चालु आहेत असा आहे. अशा उद्योगांना परिच्छेद-६ प्रमाणे प्रदुषणात घट होत असल्यास आधुनिकीकरण व विस्तारीकरण किंवा उत्पादनाची अदलाबदल करण्यास अनुमती मिळेल. यामध्ये अस्तित्वातील उद्योग म्हणजे असे उद्योग की, ज्या उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमीपत्र अणि पर्यावरण विषयक परवाना किमळालेला असून तो आजतागायत वैध आहे किंवा वैधता संपण्यापूर्वी ज्यांची वैधता परवान्याचे नुतनीकरण करुन घेतलेले आहे, अशा उद्योगांना परिच्छेद-६ ची सवलत लागू असेल, ज्या उद्योगांची म.प्र.नि.मंडळाचे संमतीपत्र व पर्यावरण विषयक अनुमती संपुष्टात आलेली आहे आणि ते उद्योग यामुळे किंवा अन्य कारणांमुळे बंद आहेत, अशा उद्योगांना दि.१३ जुलै, २००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-६ मधील सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत.

\- - - - - - - -